Scanning and PDF creation by : Majhi Duniya

A-PDF Split DEMO : Purchase from www.A-PDF.com to remove the watermark

# हरवलेलं जग

एका मैत्रिणीला नातू झाल्याचं कळलं म्हणून नव्या बाळ-बाळंतिणीचं कौतुक करायला तिच्या घरी गेले. प्रत्यक्ष बाळंतिणीनंच दरवाजा उघडला. एका हातात धरलेल्या फोनवर ती कोणाशी तरी बोलत होती. 'लास्ट फिफ्टीन डेज, आय वॉज ए बिट टाईड अप यू नो.' पंधरा दिवसांपूर्वी बाळ जन्मलं होतं. त्यामध्ये अंमळ अडकल्याची तक्रार पठ्ठी आपल्या मैत्रिणीला करत होती. तेवढा एक उल्लेख सोडला तर ती अजिबात बाळंतिणबाई दिसत नव्हती. डोळ्यात काजळ, कानात कापसाचे बोळे, पायात सपाता, डोक्यावर पदर हा जुना बाळंतिणीचा 'युनिफॉर्म' तिच्यावर कुठेच नव्हता. छान सलवार कमीज घातलेला, ओठावर हलकीशी लिपस्टिक आणि कुशीमध्ये बाळाऐवजी फोन घेतलेला, या आधुनिक अवतारातली ती बाई बाळंतीण आहे, हे मानायला मला जड गेलं. तेवढ्यात कौतुकाचे ते बाळ गाठोड्यातून खोलीत आणलं गेलं. मी त्याच्याजवळ जाऊन त्याला हलकेच हुंगलं. त्याचा सगळा थाटमाट व्यवस्थित होता; पण त्याला जराही तान्हुल्याच्या कोवळ्या गंधानं घेरलेलं नव्हतं, ना ओवा शेपा वगैरेंच्या धुरीचा वास, ना डोळ्यात घातलेल्या घरगुती समईवर धरलेल्या काजळाचा गंध, ना अंगाला लावलेल्या साय-हळदीची कोमल लहर. ऊद-धूप-वेखंड-जायफळ-मायफळ असल्या गोष्टींच्या काढ्याओढ्यांचा तर गंधही नव्हता बेट्याला. त्या गंधाविणा ते बाळ मला उगाचच रितं रितं वाटलं. मग वरती बेबी पावडरचा भलामोठा थर का असेना! पावडर ती पावडर! धुरी ती धुरी!

Scanning and PDF creation by : Majhi Duniya

आताशा असं खूपदा होतं. अतिशय जवळच्या परिचयाचं एखादं माणूस-प्रसंग-परिस्थिती बघायला जावी आणि एखाद्या छोट्या संदर्भाअभावी तिची खूणच पटू नये असं. तो संदर्भ महत्त्वाचा नसतो, तो गमावल्याने फार काही गमावणारं नसतं. त्या एका जुन्या संदर्भाच्या ठिकाणी शंभर नव्या गोष्टी आलेल्या असतात. त्या अर्थातच आधुनिक चकचकीत असतात. हे सगळं खरं आहे. तरीही ओळख पटत नाही, हरवलेपण सुटत नाही. अशाच काही हरवलेल्या 'कै.' हाय वगैरे गोष्टींची ही स्मरणयात्रा आहे.

आता या चिमुकल्यांचंच बघा ना. काही दशकापूर्वीचा काळ असता तर याच्या कोवळ्या दंडावर त्या क्रूर गोल चक्रीनं देवीची लस टोचून घ्यावी लागली असती. आता देवीचंच उच्चाटण झाल्यामुळे तो अघोरी प्रकार बंद झालेला आहे. मुलांनी वाढत्या वयामध्ये गालगुंड किंवा तत्सम आजार झाल्यावर गालावर बेलाडोणाच्या पट्ट्या लावून फिरण्याचा विनोदी प्रकारही आता बंद झालेला आहे. उन्हाळ्यामध्ये पाठी घामोळ्यांनी भरून जाणं, कैरी किंवा आंबा उतल्याने गळवं होणं, उष्णतेला मारक म्हणून डोईवर एरंडाचं पान थापून फिरणं, ही एकेकाळची सवयीची दृश्यं आता दिसत नाहीत. वैद्यकशास्त्र आणि सौंदर्यशास्त्र सतत विकसत असल्याने व्याधिग्रस्त व्यक्तींचं विद्रूप होणं खूप कमी झालंय. तिरळेपणा, मोतीबिंदूच्या शस्त्रक्रियेनंतर सोडावॉटरच्या बाटलीच्या तळाएवढी जाड भिंग डोळ्यांवर चढवणं, कानामध्ये भलीमोठी श्रवणयंत्रं घालणं, या गोष्टी कमी झाल्या आहेत. कमी-जास्त बहिरी माणसं कानाच्या पाळीमागे हात धरून, कान पुढे आणल्यासारखं करून गप्पांमध्ये भाग घेत. ती लकब आता दिसत नाही. अधू डोळ्यांनी आणि क्षीण कानांनी जे बाहेरचं जग आजमावायचं तेही बेटं खूप बाबतीत वेगळंच वाटतं. खाण्यापासून, गाण्यापर्यंत, केसकपड्यापासून हिंडण्याफिरण्यापर्यंत.

खाण्याचंच बघा ना. आज आंतरदेशीय, आंतरवैश्विक खाण्याची चौफेर चंगळ असताना खूप बाळपणी चाखलेल्या चवी मला हरवल्यासारख्या वाटतात. लाल चवळी, पिवळे मूग ही चविष्ट गावरान कडधान्यं निदान शहरात तरी दुर्लभ झाली आहेत. हरभऱ्याची आंब, पोकळा, टाकळा, चंदनबटवा, हेटीची फुलं अशांसारख्या पालेभाज्या सहजासहजी मिळत नाहीत. श्रावणसोमवार, ऋषीपंचमी, शिळासप्तमी, भोगी, भरणीश्राद्ध, पाचवीची पूजा अशा विशिष्ट प्रसंगी केले जाणारे पदार्थविशेष खायला मिळत

Scanning and PDF creation by : Majhi Duniya

नाहीत. भाज्यांच्या शिरांच्या चटण्या, सालांचे सांडगे अशी काटकसर करायला गृहिणींना वेळ नाही. ते ठीकच आहे. तसंच रॉकेलचा स्टोव्ह, वातीचा स्टोव्ह, लाकडाची-कोळशाची -भुश्श्याची शेगडी ही साधनं लोपली असल्याने त्यामुळे पदार्थांना येणाऱ्या वेगवेगळ्या चवी नष्ट झाल्या आहेत, हेही खरं आहे. साधी गोष्ट असे. पुष्कळ गावांमध्ये मोक्याच्या ठिकाणी भडभुंजांच्या भट्ट्या असत. लाकडी चुलाण्यावर वाळूमध्ये फोडल्या जाणाऱ्या लाह्या, भाजले जाणारे फुटाणे-खारेदाणे-वाटाणे सगळा आसमंत दरवळून सोडत. विशेषत: श्रावण शुक्रवारी हवेत पावसाचा ओला गारवा असताना या खमंग उष्ण गंधाच्या लहरी त्यात मिसळल्या की आपोआप पाय तिकडे खेचले जात आणि ‘ शुक्रवारचे चणे ’ एखाद्या पक्वान्नासारखे गोड लागत. आता शहरी सुपरमार्केटमध्ये अत्यंत देखण्या पॅकिंगमध्ये मृतप्राय चणेदाणे केव्हाही विकत मिळतात; पण त्यांना ती जुनी सुगंधी चव लागत नाही. वरती तिखट, मीठ, चाट मसाला अमुकतमूक यांचा भराव घालून चव आणायची केविलवाणी धडपड करावी लागते. लोखंडी खलबत्त्यात कुटलेले दाणे, लोखंडी-पोलादी कढईत परतलेल्या भाज्या यांना त्या त्या धातूची चवही लागत असे आणि थोडाफार वर्णही येत असे; पण त्या काळपट-मातकट रंगाचीही एक वेगळी मजा असे. आता निर्लेप पठडीतल्या भांड्या-मधले पदार्थही निर्लेप होतात. कमी तेलात होतात, जास्त आरोग्यवर्धक होतात. हे कबूल करूनही त्यांना त्यांची जुनी व्यक्तिमत्वं आढळत नाहीत हे जाणवतंच. पुष्कळ वर्षं घरात गवळी येऊन मोठ्या बरणीतलं दूध मोजून घालत असत. लांबचा प्रवास करून हलत हिंदकळत आलेल्या



Scanning and PDF creation by : Majhi Duniya

त्या बरण्यांच्या तोंडाशी कच्च्या सायीचे गठ्ठे जमत. दुधालाही बरणीच्या-पॅकिंगसाठी झाकणात कोंबलेल्या वाळलेल्या गवताचा वास येत असे. आता दुधाचं ते निरसं रुपडं आणि चव फारच क्वचित समोर येते. कोणत्याही डेअरीतलं पिशवीबंद दूध सारखंच वाटतं. या काही जिनसा गायब झाल्या तशाच त्या विकणाऱ्या, घरापर्यंत आणणाऱ्या व्यक्तीही काळाच्या पोटात गडप झाल्या. पूर्वी खडेमीठ हातगाडीवर टाकून विकायला येत असे. मिठाचे ते करडेपांढरे खडे उन्हात छानपैकी चमकत. ते मीठ रत्तलावर तोलून घरी आणायचं, वाळवायचं, पाट्यावर वाटायचं हे उद्योगही अर्थातच गृहिणींच्या मानगुटीवर बसत. आता हे कामही संपलं आणि हे विक्रेतेही सरले. खांद्यावर पिंजणयंत्र घेऊन टुंईटुंई टुंई असा आवाज करत रस्त्यावरून जाणारे कापूसपिंजारी, सागरगोटे, वाखाचा दोरा, केरवा मणी वगैरे विकायला निघालेल्या गोंड बायका, माठामध्ये लोण्याचा गोळा पाण्यात तरंगत ठेवून हाकारे घालत येणारे लोणीविके, उकडलेले शिंगाडेवाले, गोग्रास घालण्यासाठी दाराशी गाय घेऊन येणारे गुराखी, वासुदेव, भिक्षेकरी ही जुनी ओळखीची माणसं आता दिसत नाहीत. लहान गावांमध्ये क्वचित कुठेकुठे एकटीदुकटी दिसत असतील एकवेळ; पण सरासरीने दुर्मिळच.

कोणी प्रवासाला निघालं की हातावर दही घातलं जात नाही आणि प्रवाश्याच्या हातात वळकटी-फिरकीचा तांब्या, तीनचार पुडांचा टिफीन कॅरिअर या खास प्रवासी वस्तूही दिसत नाहीत. सायकलवरून जाताना लेंग्याच्या पायाला गार्टर लावून जाणारी माणसं दिसत नाहीत. उन्हातान्हातून कुठे पोहोचलं तर गूळपाणी पुढ्यात येत नाही. चहाकॉफी येते; पण ' कोको ' हे पेय जवळपास दिसत नाही. शाळेच्या अभ्यासातल्या पुस्त्या गेल्या, दगडी पाट्या गेल्या, त्याच गेल्यामुळे त्या पुसण्याचे ओले स्पंज कोंबून ठेवायच्या कुबट डब्या गेल्या, शाईच्या दौती, पेनात शाई भरण्याचे ड्रॉपर अशी शिक्षणसामग्री गेली. वरचेवर तुटणाऱ्या दगडी पेन्सिली गेल्या. ओली पाटी वाऱ्यावर हलवून वाळवताना म्हणायची गाणी गेली, किती आठवावं ? परीक्षा संपली की शेवटच्या पेपरनंतर बाहेर पडणारी विद्यार्थीसेना शाळेच्या कम्पाऊंडच्या भिंतीवर आपटून शाईच्या दौती फोडत असे. तो खेळही अर्थातच गेला. शाळांची इन्स्पेक्शनं आणि त्यांचा धाक हा बऱ्याच प्रमाणात कमी झाला. त्यासंबंधातले विनोदही कमी झाले. मुलांची पाठांतरं विरली. रामरक्षा, परवचा, गीताई, भगवद्गीतेचा अठरावा अध्याय ही पाठांतराची

Scanning and PDF creation by : Majhi Duniya

जंक्शनं गेली. बिनाका गीतमाला आणि तिची ती दिमाखदार 'पहली पायदान...' याचं कौतुक संपलं. 'आवाजकी दुनियाके दोस्त' तिच्याशी दोस्ती करण्याऐवजी दुश्मनीच करू लागतील एवढा हलकल्लोळ बाहेर माजला. मोठ्या माशांनी छोटेमासे गिळावेत तसे मोठ्या आवाजांनी छोटे आवाज गिळून टाकले.

'कृष्णाकाठी कुंडल आता पहिले उरले नाही...' असा सुस्कारा मला सोडायचा नाहीये. त्याचा काही फायदाही नाही. फक्त हरवलेल्या गोष्टींमुळे हलकेहलके भोवतालचं जगही अनोळखी वाटायला लागलंय. तेही अगदी एकेकट्या माणसापासून जंगी सण समारंभापर्यंत.

पूर्वी नुक्ती मुंज झालेले मुलगे, नव्या नवऱ्या, नव्या बाळंतिणी बघताक्षणी ओळखू येत. इयत्ता तिसरी-चौथीचे वर्ग उन्हाळ्याच्या मोठ्या सुटीनंतर भरले की वर्गात निम्मी पाऊण मुलं शेंडी घेरा अशा 'केशभूषे'त दिसत. नवीन लग्न झालेल्या मुली मंगळसूत्राच्या उलट्या वाट्या मिरवत. बाळंतिणी चांगल्या दोन तीन महिने मऊ तुकतुकीत कांतीच्या दिसत. त्यांच्या आयुष्यात नुकतीच काही महत्त्वाची घटना घडून गेली आहे, हे सांगावं लागत नसे. आत्ताच्या काळात लग्नानंतर, अपत्य जन्मानंतर, दहाव्या-पंधराव्या दिवशी नोकरीवर रुजू होणाऱ्या तरुणींना ही चैन परवडत नाही. पुढे जड जाऊ नये म्हणून त्या पहिल्या दिवसापासूनच सर्वसाधारण राहू लागतात, वागू लागतात. लग्नाचा-गरोदरपणाचा 'फॅन्सी ड्रेस' चटकन उतरवून मोकळ्या होतात आणि हे केवळ सुखचैनीच्या दिवसांपुरतंही नाही. एखाद्या घरात मृत्यु ओढवल्याचं वृत्त घरच्या पुरुषांची तासलेली डोकी जगाला जशी काही ओरडून सांगत. त्यातून घ्यायचा तो इशारा घेऊन आप्तेष्ट त्यांचं सांत्वन करत, दखल घेत. पुढे सणावाराला त्यांच्या घरी मिष्टान्न पोचवत.



Scanning and PDF creation by : Majhi Duniya

आता मंडळी एखाद्याला 'पोचवून' आली की काही तासातच आपापल्या कामाच्या ठिकाणी पोहोचायच्या घाईला येतात. नाहीतरी गेला तो गेलाच. इतरांचा खोळंबा कशाला, असा ठणठणीत विचार करतात. तो अजिबात चूक नसतो. फक्त अंमळ जास्तच कोरडा वाटतो, एवढंच म्हणता येईल. एका परिवारात सांत्वनाला जाण्याचा प्रसंग आला. खोलीत कोपऱ्यात तेलाचा दिवा जळत होता आणि माणसं एका नव्या रिमिक्स गाण्याबद्दल बोलत होती. दुर्घटनेनंतरचा चौथापाचवा दिवस असावा. घर गाणाऱ्या लोकांचं होतं. रिमिक्स हा त्यांच्या अनेक अर्थांनी जिव्हाळ्याचा विषय, जाणकारीचा विषय होता. तरीही त्या दिवशी मंडळी त्याचा ऊहापोह करताना ऐकणं, बघणं जड जात होतं. शिवाय ते काहीही बोलत असले तरी मृत्यूविषयीच बोलत आहेत, असं मला वाटत होतं. त्याचं काय करणार ?

हरवाहरवीच्या या तडाख्यात सर्वांत जास्त सापडली आहे ती आपली भाषा. तिची तर खूण पटता पटत नाही. मग ते साधे सोपे शब्द असोत, वाक्प्रचार असोत, वाक्यरचना असो, शब्दांचा क्रम असो, उच्चार असोत, भाषिक उपचार असोत. खचित, गमत, यत्न, गृह्यसंस्कार, हापिस, विलायत असे शब्द कानावर पडत नाहीत. जे पडतात त्यांचे उपयोग भाषेला आणि मनालाही सारखे चिमटे काढणारे असतात. बघावं तिथं माणसं एकमेकां'ची' मदत करतात. बायका साड्या 'घालतात', मुली 'केसावरून आंघोळ' करतात. लोक ऊठसूठ एकमेकांना 'धन्यवाद' देतात. विद्यार्थी बी. ए. एम. ए. वगैरे 'करतात'. लोकांची 'मानसिकता' विचारात घेतली जाते, वक्ते, 'पुढे जाऊन', कशाचा तरी विचार करतात. प्रेक्षक हे 'दर्शक' असतात. प्रवासी सामान 'कॅरी' करतात, बायका स्वयंपाक 'बनवतात' आणि नुसत्या जेवत नाहीत तर 'जेवण करतात.' माणसं 'याच्ना' 'रच्ना', 'राज्कारण', 'पार्थ्', 'सिद्धार्थ्', 'फर्गसन' असले उच्चार बिनदिक्कत्पणे करतात. कोणे एकेकाळी शेंडीफोड्या 'श' आणि पोटफोड्या 'ष' यांच्या अचूक उच्चारांसाठी आपण खूप घसाफोड केली होती, हे त्यांना सांगण्यातही काही अर्थ नाही, असं वाटण्यासारखे क्षण असतात हे ! कुठून सुरुवात करावी, किती मागे जावं हे कळेनासं होतं. शेवटी आपण होतो तिथेच मख्खासारखे थांबून राहातो.

बदल हा सृष्टीचा नियम आहे हे तर खरंच. याशिवाय गेल्या शतकात झाले त्याहून जास्त बदल गेल्या दहावीस वर्षांमध्ये झाले आहेत हेही खरं. तेव्हा हरवलेल्या गोष्टी विसरून टाकणं हेच बरं. तरीसुद्धा मनाच्या उपजत ओढीमुळे

Scanning and PDF creation by : Majhi Duniya

असेल कदाचित; पण या सगळ्यामध्ये जिवाला चटका लावून जाते ती हरवलेली भाषा ! मनाला ओढ लावणारी, नितळ, निर्मळ, लयदार भाषा बिचारी पुरती देशोधडीला लागली आहे. 'मराठी वर्डस् रिमेंबर करायला डिफिकल्ट जाणं' हा पुलंच्या काळामध्ये विनोदाचा विषय होता. आता ही खरी वेदना देणारी बाब झाली आहे. शेवटी अशी ना तशी, माणसं भाषेनं जवळ येतात. भाषेतून जग जवळ आणतात. ते माध्यमच हरवलं तर काय करायचं हा मोठा प्रश्न पडतो.

नेहमीचा पोस्टमन साध्या वेषात दिसला की, तो आपल्याला अनोळखी वाटतो. तसंच हे बाहेरचं बदलतं जग आता बदलत्या अंगड्याटोपड्यामध्ये अनोळखी वाटणार हे ओघाने आलंच. ते त्याच्यापरीनं खूपसं देखणं-आकर्षक, सोयीसुविधांचं आहे. फक्त ते आपल्या सवयीचं, ओळखीचं नाही म्हणून बिचकवतंय् एवढीच अडचण आहे.

बाकी असल्या किरकिरी, तक्रारी करणं म्हणजे आपण आजचे उरलो नाही, जुने झालो, मागे पडलो असं नकळतपणे कबूल करणंच होय. तरुण पिढी लगेच बाह्या सरसावेल आणि खडसावेल, 'तुम्ही का उगाच गहिंवर काढताय ? तुमचं काही गेलंय का ?' उत्तरामध्ये 'आपलं' 'तुपलं'चा कीस न पाडताही असं म्हणावंसं वाटतं की या हरवलेल्या गोष्टींनी एक महत्त्वाची बाब हरवून टाकली आहे. ती म्हणजे एकूण जगण्यातलं अंगभूत वैविध्य, वेगवेगळेपण, नावीन्य. सर्वसाधारणपणे सगळी माणसं सर्व अवस्थांमध्ये एकसारखी दिसतात. सगळेच ढोबळमानाने सारखी *(नीरस ?)* भाषा बोलतात. सगळेच खाद्यपदार्थ बारा महिने मिळत असतात, खाल्ले जातात. विशिष्ट ऋतू, हवा, सणसमारंभ, दिनमाहात्म्य, खाद्ययोग, वस्त्रयोग असं कुठेही काहीही दिसत नाही. 'सब घोडे बारा टक्के' म्हणतात तसा सर्वत्र सारख्याच धुमश्चक्रीत 'जनांचा प्रवाहो चालला,' असा अनुभव येतो. म्हातारी मेल्याचं दुःख नाही, काळ सोकावतो. तसंच मूठभर, पसाभर जुन्या गोष्टी हरवल्याचं दुःख नसतं. त्यामुळे एकूण जगणं फारच सपाट, सपक, गुळगुळीत, चाकोरीबद्ध होतंय, याची बोच लागून राहाते. काय करावं ? पाणी सोडावं का भंगलेलं चित्र मनात जोडावं ? मनं पुरती गहाळ होण्याच्या आत या प्रश्नांची उत्तरं जरी सापडली तरी खूप झालं !

Scanning and PDF creation by : Majhi Duniya

# आवाजांची दुनिया

लिहायला लागल्यापासून, म्हणजे गेली कित्येक वर्षं, माझा एका गोष्टीचा शोध सुरू आहे. तो म्हणजे 'शांतता.' लोक प्रतिभेचा शोध घेतात, लिहिण्यासाठी वेगवेगळे विषय शोधत असतात, असंही ऐकलंय. मला त्याची गरज पडली नाही. प्रतिभा नावाची चीज आपल्याकडे बेतासबात आहे हे मला फार पूर्वीच कळून चुकलंय! त्यामुळे तिचा शोध घेण्याचा सवाल आला नाही. आपल्या डोळ्यासमोर एवढं मोठं आयुष्य धो... धो... वाहात असल्याने लिहिण्यासाठी विषयाचा तुटवडा सहसा पडलेला नाही. लिहिण्यासाठी आपली ताकद, क्षमता, हौस कमी पडते; विषय खूप असतात. राहता राहिला शांततेचा मुद्दा! ती पठ्ठी मात्र मला कायम हुलकावणी देत असते आणि दिवसाकाठी एकदा तरी माझ्या तोंडून पडत असतं, 'अरेऽ मला जरा लिहू द्या रे... थोडी शांतता पाळायला काय घ्याल?'

माझी मुलं लहान होती, तेव्हा त्यांना मी असंच विनवत असे. 'अरे ऽ मला जरा...' ती बिचारी मला लिहायला 'नको' थोडीच म्हणत होती? त्यांचे सारे 'आवाजी' उद्योग सुरू असायचे आणि माझं डोकं उठायचं एवढंच. अगदी लहान असताना मुलगा सारखा क्रिकेटमय असायचा. टेनिस बॉल हातात घेऊनच घरात वावरत असायचा. त्याचे 'टप्पे-टप्पे...' करणं ऊर्फ बॉल जमिनीवर आपटणं आणि उसळल्यावर झेलणं सुरू झालं, की एका लयीत एक

Scanning and PDF creation by : Majhi Duniya

आवाज होत राह्यचा. दिवसाच्या कुठल्याही वेळी त्याच्या मनात आलं, की ठकठक, ठकठक सुरूच! मी खूपच आरडाओरडा केला, तर तोच बॉल तो दोरीला टांगायचा आणि बॅटने बडवत बसायचा. मधल्या एका टप्प्यावर *(बॉलच्या नव्हे, काळाच्या टप्प्यावर)* त्याने गाण्याचा नाद घेतला आणि आमच्या घरातले कॅसेट प्लेअर्स 'फुल्ल व्हॉल्यूम'वर किंचाळायला लागले. तेव्हाचे ते अब्बा, बोनीएम्, अग्नी, जॅक्सन वगैरे गायक लोक एकदम अंगात आल्यासारखं ढाण-ढाण... बडवायला लागायचे किंवा पोटात कळा आल्यासारखं विव्हळायला लागायचे; पण ते जे काही असायचं ते साधारण हजार लोकांच्या सभेपुढे सादर करावं, अशा पट्टीमध्ये असायचं. त्या संगीतकल्लोळात मुलाला म्हणे अभ्यासही सुचायचा आणि माझ्या पुढ्यातल्या कागदावर एक अक्षरही उमटायचं नाही. डोकं उठायचं... कपाळावरची शीर उडायची... छातीत धस्स व्हायचं... मुलगा समाधी अवस्थेत असायचा आणि मी बापडी उद्ध्वस्त अवस्थेत असायची. ह्या कोलाहलात काय करणार, कपाळ?

अशाच आणखी एका टप्प्यावर मुलीला फोन 'जडला', जागेपणी ती फक्त फोनवरच बोलत असायची. फोन हे जणू हाताच्या पंज्याचं 'एक्स्टेन्शनच'. दिवसरात्र ते वापरलंच पाहिजे. फोनवर ती तासन्‌तास बोलायची. मी कधीही कुठल्याही कारणाने हाक मारली; तर 'आलेच दोन मिनिटांत' असं म्हणायची आणि दोन तासाइतकं नव्याने बोलायला घ्यायची. ह्या दिवसांमध्ये घरात सतत फोनची घंटातरी ऐकू यायची; नाही तर फोनवर बोललेलं तरी ऐकू यायचं! याखेरीज मुलांच्या प्रचंड जनतासंपर्कामुळे पटांगणातून त्यांच्या नावाच्या हाका येणं, विशिष्ट पद्धतीच्या शिट्ट्या वाजणं, हॉर्न वाजवले जाणं ह्या प्रकारचं ध्वनिप्रदूषणसुद्धा सतत असे. लिहिण्यासाठी माणसाचा आतला आवाज जागा व्हावा लागतो म्हणतात! मला माझा बाहेरचा, रोजचा आवाज ऐकू येण्याइतपतही शांतता मिळत नसे. आतले आवाज कसले काढताय...? अन्... कसले ऐकताय? सारा आनंदच होता!

यथावकाश मुलं मोठी झाली, मार्गाला लागली. म्हणजे, माझ्या मार्गातून दूर गेली. मला वाटलं, आता काय, शांतताच शांतता. लिहा किती काय महाकाव्यं लिहायचीयेत नी! पण मुलं दूर दूर होत गेली तसतसे माझ्या रिकाम्या घराचे, दैनंदिन व्यवहारांचे आवाज मला जास्तच जाणवायला लागले. दरम्यान घरातली यंत्रसामग्रीही वाढली आणि आपापल्या तालासुरात ती सगळी यंत्रं

Scanning and PDF creation by : Majhi Duniya

सतत गुणगुणत असतात, हे भान नव्यानं जाणवू लागलं. रेफ्रीजिरेटरची अष्टौप्रहरची गुणगुण... मिक्सरची गरगर आणि घरघर... टोस्टरमधल्या पावाच्या तुकड्यांचं टणाटणा उड्या मारणं... कपडे धुण्याच्या यंत्राचा गडगडाट... स्कूटर-मोटार वगैरे फिरत्या वाहनांची चलबिचल... पाणी शुद्ध करणाऱ्या यंत्राची संगीतमय कामगिरी... प्रेशरकुकरच्या, मिल्ककुकरच्या टवाळ शिट्ट्या... किती आवाज असतात सभोवती, क्षणोक्षणी, सदैव! ह्या सर्वांच्या वाद्यमेळात क्षणाची तरी शांतता मिळणार आहे का मला?



त्यातच मोबाईल फोन नामक शुक्लकाष्ट मागे लागलं आणि त्याने सर्व आवाजांना कायमचा शह दिला. कोणी 'जन गण मन...'च्या सुरात हलवतंय... कोणी 'सारे जहाँ से अच्छा...' म्हणून कंठशोष करतंय... कोणाचा 'हम होंगे कामयाब...' म्हणून गजर चाललाय! प्रत्येक हिंडत्या-फिरत्या माणसाच्या खिशात मोबाईल असणारच आणि तो वेळी अवेळी गाऊन वैताग आणणारच! ह्या सगळ्या सुधारणांनी खूप फायदा झाला आहे असं क्षणभर मान्य केलं; तरी त्यांनी शांततेला कायमची तिलांजली दिली आहे, यात काही शंकाच नाही! सारांश काय? माझा शांततेचा शोध हा नेहमी तसाच आणि तेवढाच जारी राहिलेला आहे. कधीतरी खरीखुरी शांतता मिळेल आणि आपण १०१% एकाग्रतेने काही बरं लिहून दाखवू शकू, ह्या क्षीण आशेवर माझा लेखनसंसार डगमगत उभा आहे एवढंच!

Scanning and PDF creation by : Majhi Duniya

पूर्वीच्या लेखक-कवींनी कशी महाकाव्यं लिहिली, मोठी ग्रंथसंपदा निर्माण केली. त्यामानाने सध्याचे आम्ही लेखकलोक म्हणजे नुसतेच मजकुराच्या चिठ्ठ्या खरडणारे. असा आक्षेप घेणाऱ्यांना द्यायला माझ्यापाशी एक उत्तर नेहमी तयार असतं. 'त्यांच्या काळात शांतता किती होती.' तेव्हा काय 'निकम्मा', 'खल्लास', म्मन्नम्मोरा ऽऽच्या ऽऽ कस्सा पिस्साऽऽरा फुल्लल्ला' अशी भेसूर गाणी गळत होती? तेव्हा काय शेजारी मध्यरात्रीपर्यंत केबलवरचे सिनेमे बघत होते? तेव्हा तासाला सव्वाशे/दीडशे मैलांच्या गतीने पळणारी वाहनं कितीशी होती? त्या चोरांना काय, वेळूच्या बनातून वाहणाऱ्या वाऱ्याची शीळसुद्धा ऐकू यायची! लब्बाड कुठले! तेव्हासारखी शांतता लाभली असती तर आम्हीसुद्धा हातोहात महाकाव्यं लिहिली असती, नाही का? *(चाल : अशीच अमुची आऽऽ असती... आम्हीही सुंदर झालो असतो!)*

सारांश काय, सध्यासारखा आवाजाचा उपसर्ग नसता तर आम्हीही ग्रंथांचे सर्गावर सर्ग रचले असते. प्रश्न प्रतिभेचा नाही; शांततेचा आहे. शांतता घरातलीही, बाहेरचीही! एरवी साधा चेक लिहायचा म्हटल तरी आपल्याला बैठक लागते. *(काही थोर लोक चेक लिहितानासुद्धा मुद्दाम चुका करतात आणि धनादेश नापास होऊन आल्यावर 'धन' वाचावे असा आदेश देतात.)* त्यांची गोष्ट वेगळी. एकाग्रता लागते, कुठे चूक राहू नये म्हणून लक्ष द्यावं लागतं. मग थेट साहित्यसेवाच करायची म्हटली; तर किमान शांतता तरी नको का? त्याशिवाय मनातलं जनात, एकांतातलं लोकांतात वगैरे कसं बरं उमटावं? कै. शांताबाई शेळके नेहमी म्हणत असत, प्रतिभा ही विजनात फुलणारी वेल आहे. अगदी विजन असलं तरी तिथे हजर असलेल्या जनांनी थोडं शांत राहिलं; तर काही बिघडेल का ? मी अधुनमधून काकुळतीनं म्हणत असते आणि ऐकू आलं तर स्वत:चेही ऐकते. अर्थात अशी आर्त हाक ऐकायलाही आता कोणाला वेळ आहे म्हणा? आणि बाहेरच्या एकूण गदारोळात ती जाणार तरी कोणाच्या कानी? एकूणच आधुनिक दुनिया ही 'आवाज की दुनिया' झालेली आहे. एकेकाळी रेडियो सिलोनवरून अमीन सयानी साद घुमवीत असे, 'आवाज की दुनिया के दोस्तो... नमस्कार' कारण तेव्हा 'आवाज की दुनिया' दिवसातले ठराविक तासच असे. तिला आकाशवाणी, रेडियो वगैरे म्हटलं जाई.

दिवसेंदिवस आपलं सार्वजनिक जीवन, सामाजिक जीवन फार गोंगाटाचं झालंय असं जाणवतं. मुळामध्ये चौफेर असलेली माणसांची गर्दी आणि ती माणसं सारखे नाना प्रकारचे उद्योग करणार! मग आवाजांना काय तोटा?

Scanning and PDF creation by : Majhi Duniya

रस्त्यावर वाढलेली वाहतूक, वाढलेला व्यापार आणि एकूणच दिवसाच्या कोणत्याही वेळेला असणारी बजबज आसमंतातली शांतता शोषून घेत असते. वाहनांची इंजिनं वाजतात, वाहनांचे कर्णे तर वाजवण्यासाठीच लागलेले असतात त्यामुळे ते वाजतात, वाहनं जितकी जुनीपानी तितके त्यांचे 'अवयव' वाजतात. म्हाताऱ्या माणसांची हाडं जशी उठता बसताना कडाकडा वाजतात तशा जुन्या रिक्षा, बसेस ह्याही धावताना तऱ्हतऱ्हेची धडधड व्यक्त करतात. फेरीवाले हाका घालत असतात, ग्राहक हुज्जत घालत असतात, त्यातच काही हौशी वीरांना आपापल्या दुचाक्या ह्या त्यांचे 'सायलेन्सर' काढून पळवण्याची हुक्की येते. कर्कश आवाजानं सगळा रस्ता कापत गेल्यासारखी ही मंडळी वाऱ्याच्या वेगाने ये-जा करतात. त्यात रस्त्यांची अवस्थाही रमणीय! तेव्हा प्रत्येक खड्ड्याची नोंद घेताना वाहनांनी कुरकुर, धुसफूस करणं हे ओघाने आलंच. असा एवढा रस्ता बांधलाच आहे म्हटल्यावर; त्यावरून वराती, मिरवणुका, मोर्चे वगैरे जाणारच! त्यांचा गलका कसा काय चुकवता येईल? ह्या सगळ्या गदारोळात भाविकांचीही सोय व्हायला हवी म्हणून बहुतेक रस्त्यांच्या कोपऱ्यावर, नाक्यावर छोटीमोठी देवळं असतात. लोकांना वाहनावरून जाता-जाता ईश्वराला पटकन हात जोडता यावं, हाय-हॅलो करता यावं अशा सोयीने बसलेले किंवा बसवलेले देव असतात. म्हणजे वर्षातून एकदा दोनदा-तरी त्यांचे जन्मदिन, सण, उत्सव, तिथी वगैरे समारंभ हे तर ठरलेलेच. माणसांचे नियम देवांना थोडेच लावता येतात? त्यांना गोंगाट माफ! रात्ररात्र चालणारी भजनं, 'मदद करोऽऽ संतोषी माता', 'अटरिया पे लौटन कबूतर' छाप गाणी, निदानपक्षी 'ऐका दाजिबाऽ' हे तरी जाणाऱ्यायेणाऱ्या दाजिबांनी सहन केलंच पाहिजे. एकूण काय, रस्ते माणसं वाहून नेतात. त्याहून खूप मोठ्या प्रमाणावर आवाज वाहून नेतात. त्या त्या ठिकाणची नगरपालिका, नगर परिषद वगैरे ह्या प्रकारला आळा घालण्याचा प्रयत्न करत असते. अमुक डेसिबलच्यावर ध्वनी जाता कामा नये, रात्री अकरानंतर ध्वनिक्षेपक-वर्धक लावता कामा नये, असले काहीबाही फतवे काढत असते. उत्साही मंडळी तो आवाज वाढविण्याचा परवानाच आहे असं मानून ऐकणं असह्य व्हावं असं ध्वनिप्रदूषण माजवायला सुरुवात करतात. 'वाजवा रे वाजवा' आणि 'गाजवा रे गाजवा' ह्या युगमंत्रात शांततेला 'घालवा रे घालवा' हे जणू गृहीतच असतं.

ही सामाजिक समस्या आहे तशीच माझी व्यक्तिगत समस्याही आहे. जरा कुठे लिहायला बसलं, की मला तात्पुरती एक कानांची जोडी नव्याने फुटते की;

Scanning and PDF creation by : Majhi Duniya

काय कळत नाही. अलम दुनियेत कुठे काही खुट्टं वाजलं तरी ते तेव्हा नेमकं ऐकू येतं. कुठे नळ सारखा ठिब-ठिबकतोय... कुठे पाल चुकचुकत्येय... कुठे दरवाजाची बिजागरी करकरत्येय... झोपाळा घासतोय... धान्य चाळलं जातंय... गच्चीवर छोटी मुलं पकडापकडी खेळताहेत... प्लेअरमधली कॅसेट नुस्तीच फिरतेय... खिडकीतलं वर्तमानपत्र वाऱ्यामुळे फडफडतंय... रस्त्यावर कोणीतरी करकचून ब्रेक दाबून वाहन थांबवलंय... मूल रडतंय... दमेकरी खोकतोय... कोणीतरी मोठ्यानं शिंकलंय... रेशमी पातळ सळसळतंय... जिन्यातून येणाऱ्या कोणाच्या तरी चपला घासताहेत... किती हे ध्वनी ! ह्यातून आपला सूर लागायचा कसा ?

फार मोठ्या प्रतिभावंतांची म्हणे लिहितालिहिता संवेदनक्षमता तरल होत जाते. आमच्यासारख्यांचे आपले कानच तेवढे तरल होत जातात. तेही नको तेव्हा नको तितके ! मग सगळी चिडचिड शेवटी माझ्या आवाजात उतरते, ‘ अरेऽ जरा शांत राह्यला काय घ्याल ? ’

माझ्या ह्या शांतीच्या शोधाला सर्वस्वी छेद देणारा अनुभव पुढे मोठ्या झालेल्या माझ्या मुलानं सांगितला. इंग्लंडमध्ये एका उपनगरातल्या विद्यापीठामध्ये तो शिक्षणासाठी दाखल झाला होता. तिथे जगभरातले विद्यार्थी असायचे. वर्ण-भाषा-धर्म-आवडीनिवडी-सवयी-लकबी ह्या साऱ्यांची भरपूर भेळ झालेली होती; पण ख्रिसमसचा दिवस आला आणि सगळी पांगापांग झाली. कोणी मायदेशी गेलं, कोणी त्या देशातल्याच आप्तमित्रांकडे गेलं, कोणी पिकनिक-दौरा असा हौसेचा प्रवास करायला गेलं. शेवटी काही तास माझा मुलगा एकटाच त्या परिसरामध्ये उरला. आधीच इंग्लंडचं उदास वातावरण, त्यात थंडी, त्यात निर्मनुष्यता आणि त्यात एवढ्या मोठ्या परिसरात माझा तरुण मुलगा तेवढाच एकटा ! भयाण, एकाकी ! घरामध्ये बसवेना म्हणून रस्त्यावर गेला. तिथे तर त्याला शांतता सहन होईनाशी झाली. सैरावैरा पळत सुटला. कोणीतरी पकडेल, मारेल, खून करेल ह्या भीतीने नव्हे; ही शांतता आपल्याला गिळून टाकेल ह्या भीतीने. तिथे रस्त्यामध्ये मोकाट फिरणारी जनावरं, पाखरं ह्यांचाही वावर नव्हता. शांततेच्या विराट पोकळीमध्ये हा एकटा माणूस आवाजाच्या शोधात भिरभिरत होता. त्याला आवाज हवा होता, माणसांचा, प्राण्या-पक्ष्यांचा, श्वासांचा, आयुष्याचा. आयुष्य आहे व ते चालू राहणार आहे असा विश्वास देणारी ही आवाजाची दुनिया केवढी अनमोल आहे, हे त्याला त्या काही क्षणांमध्ये आरपार कळून गेलं. नंतर कधीतरी मला फोनवर त्याने

Scanning and PDF creation by : Majhi Duniya

विचारलं —

"मग काय आईबाई, सध्या लेखनाचं काही जमतंय को नाही ?"

"नाही रेऽ शांतता मिळायच्या नावानं शंख आहे ना..."

"सारखं शांतता... शांतता करू नकोस, आई. शांतता सहन करायची पण ताकद असावी लागते आपल्यामध्ये. तू थोडीफार गजबजाटात असशील ना, तीच बरी." त्यानं मोठेपणानं सांगितलं. मला गंमत वाटली. वाटलं, हा लहानपणी आवाज करून मला ताप देत होता; आता उपदेश करून ताप देतोय. प्रत्यक्षात मुलगा माझ्यासमोर असता तर ओरडले असते, 'गप्प राहा रे... फार शहाणपणा शिकवू नका मिस्टर.'; पण मुलगा फोनवर होता, दूर-देशी होता म्हणून शांत राहिले. शांततेची सदैव मागणी करणाऱ्या व्यक्तीने स्वत:तरी शांत राहायला हवंच ना ? निदान अधुनमधून, कधीमधी, चुकूनमाकून ?

काही माणसांना गोंगाट, कलकल, गजबज उपजतच आवडत असावी, असा माझा वहीम आहे. आपल्या घरामध्ये धुणंभांड्याची कामं करणाऱ्या बायका आठवा. काम सुरू करण्याच्या क्षणापासून त्या धो... धो... पाणी सोडून ठेवतात. भांड्यांचा हारा रिकामा करताना त्या दाणकन सगळी भांडी जमिनीवर ओततात. पाण्याचा धबधबा... भांड्यांचा गडगडाट दूरवर आपल्याला त्रासदायक वाटतो, मग या बायांना ते कसं सहन होत असेल ?

पिठाच्या गिरणीत काम करणारे लोक, कपडे विणण्याच्या यंत्रांवर-हातमागांवर काम करणारे लोक, धातूचे पत्रे कापणारे, ठोकणारे, भांडी बनवणारे लोक, डबिंग स्टुडियोमध्ये काम करणारे लोक ह्या सर्वांच्या कर्णेंद्रियांवर केवढा ताण पडत असेल, हा विचारही मला दमवतो. परमेश्वराने डोळे बंद करण्याची सोय ठेवली आहे तशी कान बंद करण्याची सोय केली असती तर ? हा विचारही बळावतो; पण एकदा एका व्यक्तीनं ह्यालाही छेद दिल्याचं आठवतंय. हातमागांसाठी प्रसिद्ध असलेल्या एका गावात माझं भाषण होतं. खूप घरांमध्ये बाहेरच्या खोलीत माग होते, आतल्या खोल्यांमध्ये संसार सुरू होते. घरात सगळी माणसं आपोआप मोठमोठ्यांदा, ओरडून बोलायला लागलेली होती. हळू बोलतील तर ऐकतील कशी त्या मागांच्या धडधडाटापुढे ? 'कसं काय ? बरं आहे', 'तुम्ही कसे... आम्ही कसे ?' ह्याच्यापुढे मला बोलवत नव्हतं. तेवढ्यात वीज गेली. मला खूप हायसं वाटलं. चांगली ऐसपैस बसून माझ्या दृष्टीने मी निवांत गप्पा मारायला लागले; पण घरातली इतर माणसं माझ्यासारखी निवांत दिसेनात. कोणी चुळबुळतंय... कोणी पुन्हा पुन्हा बाहेर बघतंय... कोणी

Scanning and PDF creation by : Majhi Duniya

उगाचच विजेची बटणं खालीवर करतंय... न राहवून मी विचारलं,

"कामाचा खोळंबा होतोय म्हणून तुम्ही अस्वस्थ आहात का ?"

"नाही, तसंच काही नाही."

"मध्येच माग थांबल्यामुळे कामाचा दर्जा कमी पडतो का ?"

"तसंही नाही —'

"मग तुम्ही एवढे अस्वस्थ का होताय ?'

"वीज गेली ना..."

"ते मलाही दिसतंय..; पण तुम्हाला काही टीव्ही.कॉम्प्युटर वगैरे लागत नाहीये. तरीही ही एक प्रकारची अगतिकता का ?"

"बाहेरची मशीनं थांबली... आवाज बंद पडले... मग जिवाला गोड कसं लागणार ?" कोणीतरी काकुळतीनं म्हणालं. यंत्रांचा तो अष्टौप्रहरचा धडधडाट त्यांच्या जिवाला 'गोड' लागत होता. म्हणून त्याची त्यांच्या जिवाला ओढ लागली होती. वीज गेली, यंत्रे थांबली आणि काही काळ जणू काही ती माणसंही थांबली. उगाच चहापाणी करून वेळ घालवत राहिली. काही क्षणात वीज आली आणि धाड् धाड्... बाहेरचे माग वाजू लागले. तेव्हा त्या माणसांच्या जिवात जीव आला. एक जण उत्स्फूर्तपणे म्हणाला, "आस्सं पाहिजे... आता कशीऽ..."

"मस्त कलकल आहे ना ? डोकं उठवणारी ? बी. पी. वाढवणारी ?"

"तसं नाही, ताई. बाहेरच्या आवाजानं असली मजबूत भिंत तयार होते ना... भिंतींच्या बाहेर सगळी दुनिया... आत आपण बदामातल्या-जर्दाळूतल्या बीसारखे निवांत !... भिंत गेली की एकदम उघड्यावर आल्यागत होतं हो... नको वाटतं..."

'आवाजाची भिंत' ही कल्पना मी पहिल्यांदा तिथे ऐकली. जो आवाज प्रथमदर्शनी असह्य होतो, त्याची भिंत करायची, सवय करून घ्यायची, त्याच्याबाबतची संवेदना बोथट करून टाकायची म्हणजे मामला अगदीच सोपा ! रेल्वे स्टेशनशेजारी, विमानतळाच्या रनवेजवळ, पिठाच्या गिरणीनजीक वगैरे राहणारी माणसं, त्या त्या आवाजांबद्दल असंच करत असली पाहिजेत. त्यांच्यापैकी फार कोणाला ही अवस्था शब्दात मांडता आली नसेल; पण कळत-नकळत त्यांनी ती अंगीकारली असावी ! आपल्यालाही लेखनाच्या संदर्भात असं का करता येऊ नये ?

आलं नाही एवढं खरं. बऱ्याच गोष्टी कळतात; पण वळत नाहीत त्यातला

Scanning and PDF creation by : Majhi Duniya

प्रकार म्हणायचा अन् काय? शिवाय लेखन जमत नसताना *(म्हणजे पुष्कळदा!)* ही एक खात्रीची सबबही हाताशी होती. एरवी प्रतिभेचा पाऊस पाडला असता हो; पण मला शांतता म्हणून मिळत नाही त्याला काय करायचं?

अलिकडे एखादेवेळी अवचित शांतता मिळतेही. वीज जाते. साहजिकच सगळी यंत्रसामग्री बंद पहाते. घरात माणसं नसतात. असली तरी ती आपापल्या उद्योगात मग्न असतात. दिनचर्येची कामं होऊन गेलेली असतात. नवीन कामं घ्यायची की न घ्यायची हे आपल्या हातात असतं. साहजिकच 'न घ्यायचा' पर्याय स्वीकारला जातो. काही वेळ तनमन संपूर्ण शांततेत असतं; पण तेही बेटं अंगी लागत नाही. बाहेर भलेबुरे नाना आवाज असतात ते एकमेकांना झकास छेद देत असतात. म्हणजे ह्या खोलीतून इला अरुणची संगीत किंकाळी ऐकू आली तर रस्त्यावरून बाबा सेहगलचा कॅसेटबद्ध गळा तिला गप्प करू शकतो; पण हे सगळेच भिडू थांबले तर आपणच आपल्याशी संवाद करू शकू का? बाहेरचे आवाज एकमेकांचे हिशोब चुकते करू शकतात ही केवढी सोय असते, हे अशा वेळी कळतं. नकोनको ते, जुनंपानं, त्रासाचं, अप्रिय, अपमानाचं, मनाच्या सांदीकोपऱ्यात दडवलेलं एकदमच ऐकायला यायला लागतं. दुसऱ्यांसाठी लिहवत नाही, स्वतःचं गत आयुष्य वाचवत नाही आणि ह्या सगळ्या घुसमटीवर निदान आवाजाचं तरी मजबूत पांघरूण पडावं असं वाटायला लागतं.

आता उशिरा का होईना, मला हे जाणवू लागलेलं आहे. बाहेर शांततेचा शोध घेणं व्यर्थ आहे. ती सापडणार नाही, सापडली तर टिकणार नाही, धरून तर अजिबातच ठेवता येणार ना. खरी शांतता ही आपल्या आतली शांतता. कशाचीही तगमग नसावी, कशासाठीही छाती फुटेपर्यंत पळणं नसावं. नाराजी, कुरकूर, तक्रार, खंत, हाव, स्पर्धा, हारजीत यांपैकी कुठेही काहीही नसावं. अगदी मनाच्या छोट्या कोपऱ्यातही! सगळं मन कसं समाधानाच्या प्रकाशानं आरपार उजळून निघावं. तसं झालं तर ती शांतता खरी अढळ असेल. कुठल्या बेसुऱ्या गाण्यानं, कुठल्या उठवळ वाद्यमेळानं, विवेकशून्य भांडणतंट्यानं ती भंगणार नाही. संपन्नतेत-विपन्नतेत ती आपली साथ सोडणार नाही. चहूबाजूंनी घनगंभीर स्वरात आवर्तनं उठतील, 'ओम् शांतिः... शांतिः... शांतिः...'

Scanning and PDF creation by : Majhi Duniya

# अनेक लग्नांच्या गोष्टी

अरबी भाषेतल्या सुरस आणि चमत्कारिक कथा वाचण्यात माझं बालपण कसं चुटकीसरशी आणि आनंदात गेलं! तेव्हा वाटायचं की अशा रंजक, उत्कंठावर्धक गोष्टी दुसऱ्या कुठल्या भाषेत असूच शकत नाहीत; पण वय वाढत गेलं तसतसं लक्षात येऊ लागलं की मराठी भाषेतही तेवढ्याच सुरस आणि चमत्कारिक गोष्टी आहेत आणि त्या उगाच कुठल्या राजेरजवाड्यांच्या, कनीज दासींच्या किंवा तार्तरहबशी वगैरे लोकांच्या नसून चक्क तुमच्या-आमच्या घरांमधल्या आहेत. त्या आहेत अनेक लग्नांच्या गोष्टी! लग्नं जमतात कशी, पार पडतात कशी, पुढे पडतात किंवा रंगतात कशी, फसतात कुठे आणि निस्तरतात कशी, ह्या साऱ्यांबाबत समाजात सतत अनेक रोमहर्षक कथाकहाण्या पसरत असतात. लग्नं फिसकटतात... शिळीपाकी होतात... संपुष्टात येतात; पण ह्या कहाण्या कधी संपत नाहीत, उलट वाढतात. दोन व्यक्तींच्या टोकाच्या खासगी व्यवहाराचा असा सार्वजनिक पंचनामा कसा करावा, हे जगानं आपल्याकडून शिकून घ्यावंसं आहे.

'चिंगी महिन्याची झाली नाही तोच' तिच्या लग्नाचा विचार आणि उच्चार सुरू होतो. तसंच लग्न करायचंय असं म्हटलं की आजकाल वधूवरसूचक मंडळात नाव घालण्याचा विचार आणि उच्चार सुरू होतो. चांगला दिवस, तिथी वगैरे बघून घरातले वडीलधारे लोक त्या लग्नाळू व्यक्तीचं नाव 'घालतात' आणि संकटात 'घालण्याला' अशी ना तशी, सुरुवात होते.

Scanning and PDF creation by : Majhi Duniya

एक काळ होता, जेव्हा बहुसंख्य लग्नं ही ओळखीपाळखीत, भावकीत, कुटुंबाच्या विस्तारित शाखा-उपशाखांमध्ये जमवली जात. समाज लहान होता, कुटुंब हे जीवन-व्यवहाराचं मुख्य केंद्र होतं. कुळ-कुळधर्म यांना खूप महत्त्व होतं. मुलामुलींची लग्नं लहान वयामध्ये होत असल्यानं त्यांच्या मतांना-विचारांना फारशी किंमत नव्हती. नणंदेच्या दिराच्या मेहुण्याशी किंवा चुलत चुलत काकांच्या पहिल्या बायकोच्या भाचीशी आपल्या मुलाचं लग्न जमलं तरी माणसांना हायसं वाटे. कुठंतरी काहीतरी नात्याचा म्हणजे सुरक्षिततेचा धागा आहे असा दिलासा वाटे. समाज आकारानं, व्यापारानं, गुंतागुंतीनं वाढला. वेगवेगळ्या कारणांनी माणसांचं दळणवळण वाढलं. वधूवरांची वयं आणि पर्यायानं आवडनिवड वाढली आणि हळूहळू वधूवरसूचक मंडळींची सुरुवात झाली. एखाद्या रजिस्टरमध्ये मुख्यत: लग्नाळू मुलांची यादी करत जायचं आणि अल्पमोली वर्गणी घेऊन प्रत्येक खेपेला तीन किंवा पाच स्थळांची माहिती वधूच्या पालकांना पुरवायची इतका प्राथमिक व्यवहार होऊ लागला. ही वधूवरसूचक मंडळी खऱ्या अर्थानं फक्त वरसूचक मंडळीच असत. वधू कशाला सुचवायला हव्या आहेत ? त्या पैशाला पासरीही नव्हेत, फुकटात पासरी पडलेल्या आहेत. तेव्हा सुचवायचे, कौतुकानं मिरवायचे आणि चलाखीनं जाळ्यात ओढायचे ते मुलगे, म्हणजे नवरदेवच ! या नवरदेव जमातीचा वट एवढा असे की विवाहमंडळानं सुरुवातीपासून कितीही बजावून सांगितलं असलं तरी लग्न जमल्याचं शुभवर्तमान वेळच्या वेळी संस्थेमध्ये कळवण्याचे कष्ट कुणी घेत नसत. त्यामुळे पुढे सत्यात बाप झालेल्या मुलांनाही मुली सांगून जाण्याचे अनवस्था प्रसंग ओढवत. (*'यंदा आमच्या बाबांना कर्तव्य नाही,' अशा अर्थाची वाक्यं ती नवरदेवांची बालकं दारात आलेल्या वधूपित्यांना सांगत असल्याचं अजून कळलेलं नाही; पण शक्यता नाकारता येत नाही.*).



Scanning and PDF creation by : Majhi Duniya

एखाद्या मुलाचं लग्न जमायला अंमळ उशीर लागला आणि त्याच्या घरच्यांना वधूवरसूचक मंडळाकडं जाण्याचा पर्याय कुणी सुचवला, तर त्यांना अपमानित वाटे. एवढ्या सोन्यासारख्या मुलाला संस्थेत जाण्याची वेळ येते याचा अर्थ काय ? एवढे काय आम्ही 'हे' आहोत का, 'याच्यावर' पडलो आहोत का, लग्नासाठी 'हे' झालो आहोत का, हे प्रश्न लोक मोठ्या 'यानं' विचारत.

सांगण्याचा मुद्दा असा की लग्नं ही फक्त आणि सर्वस्वी स्त्रीची-वधूची गरज असल्यानं त्यासाठी लागणारी धडपड त्याच पक्षाकडून व्हावी, असं मानण्याचा एक टप्पा येऊन गेला. शिवाय तेव्हा जनता जे मानायची तेच बोलून दाखवायची. आता या बाबतीत जमाना फार बदलला आहे. माणसं एक बोलतात, दुसरं मनात धरतात, तिसरंच करून मोकळे होतात. यात लग्न करणंसुद्धा आलं. साहजिकच वधूवरसूचक मंडळांच्या जाहिरातींमधील भाषासुद्धा बदलली. पूर्वी रंग, उंची, चष्मा असणं *(म्हणजे खरा तर नसणं)* आणि लग्नासाठी किती खर्च करू शकू याचा उल्लेख केला की लग्नाळू मुलीची माहिती संपायची. लग्नाळू मुलानं 'वधू पाहिजे'ची जाहिरात दिली तर मासिक पगाराचा आकडा आणि एकूण बंगला-गाडी-शेती वगैरे जे काही स्थावर जंगम असेल, त्याचा आवर्जून उल्लेख व्हायचा. शिक्षण सांगण्यासारखं असलं तर तो बोनस. नसलं तरी फार काही बिघडणार नाही. अशा 'आव... जाव.... घर तुम्हारा...' पठडीकडून आताची वैचारिक साहचर्याची अपेक्षा, केवळ सुसंस्कृत सोबतीसाठी जाहिरात, अशी भाषेनं मजल मारली ती दुसरं काय दर्शवते ?

बाकी वधूवरसूचक मंडळांच्या जाहिराती देणाऱ्यांची कल्पकता, प्रतिभा, प्रज्ञा, सृजनशीलता यांसारख्या दैवी गुणांना दाद द्यावी तेवढी थोडीच. 'बेसनासारखी वधू हवी' या शीर्षकांतर्गत एक जाहिरात मागे एकदा वाचलेली आठवते. वरून अंगावर बेसनाचा गोळा पडल्यासारखी दचकले होते मी तेव्हा. जाहिरातीत पुढं दिलेलं स्पष्टीकरण तर चारीमुंड्या चीत करणारं होतं. 'बेसन जसं घरामध्ये सर्व प्रकारे उपयोगी पडतं, घाईच्या वेळी त्याचं पिठलं, झुणका वगैरे करून वेळ मारून नेता येते, हवी तेव्हा बेसनलाडू-म्हैसूरपाक यांसारख्या मिष्टान्नाची चैन करता येते, रस्सा पातळ झाला तर पाण्याला हरभरा पीठ लावून तो घट्ट करता येतो, तान्ह्या बाळाला आंघोळ घालताना सायपीठ लावून साबणाचा खर्च वाचवता येतो, असे बरेच उपयोग लिहून शेवटी लिहिलं होतं, 'अशी हरहुन्नरी सून आमच्या घराला सर्वार्थानं शोभेल.' वाचून मनात आलं अशा बेसनासारख्या नवरीनं 'कढईसारखा नवरा हवा... त्याच्यात सर्व काही सामावतं... कढईत जिन्नस

Scanning and PDF creation by : Majhi Duniya

भाजताही येतो. तळताही येतो... कढईवर चाळणी ठेवून निथळतही ठेवता येतं.' अशासारखी जाहिरात दिली तर काय बहार येईल?

दरम्यान पुरोगामित्वाचा काळ आला. तो यायला हवाच होता. फक्त व्याख्येव्याख्येत अंमळ फरक होता. 'पत्रिका पाहायची नाही, रक्तगट बघणं आवश्यक.' 'कुंडलीमीलन नको; पण सहजीवनाच्या अपेक्षा पूर्ण व्हायला हव्यात.' असली वाक्यं याचीच द्योतक होत! वास्तवात आता वैद्यकशास्त्र इतकं पुढं गेलेलं आहे की वधूवरांचे रक्तगट असंबद्ध असले आणि डॉक्टरांना त्याची पुरेशी पूर्वकल्पना असली तर बाळाच्या जन्माला त्याचा काहीही अडसर येत नाही; पण लग्नाच्या अपेक्षांमध्ये 'रक्तगट' हा शब्द टाकला की लोकांना अंमळ पुरोगामी झाल्यासारखं वाटतं. तसंच नुसतं पत्रिका न म्हणता 'कॉम्प्युटराईज्ड पत्रिका' असं म्हटलं की धडाम्कन विज्ञाननिष्ठ झाल्यासारखं वाटायला लागतं. 'आमची पत्रिका ही कुडमुड्या ज्योतिष्याची नाही म्हटलं, कॉम्प्युटरवर बनवलेली आहे' असं म्हणणारे नक्की कुणाला बनवताहेत, असा मला प्रश्न पडतो. आपल्या विज्ञाननिष्ठेचा ताजा कडेलोट म्हणजे मुलगी प्रत्यक्ष न दाखवता लग्नाळू मुलींची एखादी व्हिडिओ फिल्म दाखवणं! यामुळं वधूपरीक्षा, चहापोहे हे सोपस्कार टळत असतील; पण वधूची प्रतिकात्मक मानहानी काही टळत नाही हे लोकांच्या लक्षात येत नसेल?

ते काही असलं तरी शोधाशोध केल्याशिवाय, चार लोकांना सांगितल्याशिवाय मुलामुलींची लग्नं जमत नाहीत, हे मात्र लोकांना अनुभवांती पुरतं पटलेलं आहे. म्हणून तर लग्नं जमवणाऱ्या एजंटांची ही सनातन गरज! मग त्यांना वधूवरसूचक मंडळी म्हणा नाही तर वधूवरभोचक मंडळी म्हणा. भोचकपणे वधूवरांची जास्तीत जास्त माहिती घ्यायची आणि आपल्याला योग्य वाटणाऱ्या, जोडी जुळू शकेल असं वाटणाऱ्या ठिकाणी त्यांची नावं सुचवायची या उद्योगाला मरण नाही.

वाढत्या वयानुसार आपल्याला अनेक प्रमोशन्स मिळत असतात. तसेच आपण खुद्द मुळात फक्त वधू अगर वर असणारे लोक जेहत्ते कालाचे ठायी वधू-वरसूचक व्हायला लागतो. बाईजातीला हा धोका जास्तच असतो. लोक विश्वासानं, खात्रीनं, वडीलकीनं आपल्याला स्थळं वगैरे विचारायला लागले की पहिल्यांदा जीव सुखावतो आणि नंतर यथाकाल दचकायला लागतो. 'नाही म्हटलं तरी आज तुमच्या शब्दाला जगात किंमत आहे', किंवा 'तुमचा जनसंपर्कच दांडगा म्हणून म्हटलं तुम्हाला नक्कीच हा मुलगा *(किंवा मुलगी)* माहिती असेल,' वगैरे म्हणून लोक आपल्याला हरभऱ्याच्या झाडावर चढवतात

Scanning and PDF creation by : Majhi Duniya

आणि घोळात घेत घेत माहितीचा घोळ घालतात. आजचा कुणी तरी वर आपल्या मुलाबरोबर बालपणी जिमला जात असतो किंवा कुणी तरी वधू आपल्या मुलीबरोबर बालमंदिरात असते; पण या एवढ्या छोट्या संदर्भावरून लग्नाच्या ऊर्फ *(टिकवल्यास)* जन्माच्या वायद्याला आपण पुष्टी द्यायला जावं की नाही हा मोठा प्रश्नच असतो. एकीकडं कळायला लागल्यापासून 'प्रेम-प्रेम' खेळणाऱ्या जोड्या लग्न लागताच बिथरल्या, बिघडल्या, अंतरल्या हे डोळ्यांनी दिसत असतं. पत्रिका ते रक्तगट इथंवर सगळं जुळूनही लग्न काही टिकलेलं नाही हे दिसत असतं. असं असताना आपण कुणाची कुठवर ग्वाही देणार हे कळत नसतं. वेळ नसतो, उत्साह नसतो, एवढा भोचकपणा करू नये असं वाटत असतं. बरं, धडधडीत ओळखीच्या कुटुंबाबद्दल पूर्ण विश्वामित्री पवित्राही घेणं शक्य नसतं.

हल्ली यावर माझा मी एक तोडगा शोधला आहे. स्वत: कुठलंच लग्न जुळवण्याचा वगैरे खटाटोप करत नाही म्हणा; पण बऱ्यापैकी माहितीच्या स्थळाबद्दल कुणी फारच नेट लावून विचारलं, तर खरीखुरी माहिती सांगते आणि शेवटी म्हणते, माझी माहिती कुठल्याही थिएटरमधल्या कारपार्किंगच्या तत्त्वावर असते बरं का ?

म्हणजे कशी ?

— थिएटरवाले कसे, मोटारी स्कूटरी पार्क करायला जागा देतात, प्रसंगी दिडक्याही मोजून घेतात, पण शेवटी मात्र 'कार्स पार्कड् ॲट ओनर्स रिस्क' — हे बजावयाला विसरत नाहीत. तसंच मीही सांगते — 'मॅरेज ॲरेंजड् ॲट पेरेण्टस् रिस्क' आपल्या कानी सात खडे!

तर अशा प्रकारे लग्नाची प्राथमिक मोर्चे बांधणी केल्यानंतर जेहत्ते कालाचे ठायी, वधूवरसूचक मंडळांच्या मदतीनं म्हणा किंवा आपल्या वधूवरभोचक मंडळींनी उपद्व्याप करूनही म्हणा, या सृष्टीवर माणसांची लग्नं जमायची तेव्हा जमतातच. कहीं ना कही कोई है... हा दीक्षितांच्या माधुरीचा विश्वास वाया कसा बरं घालवता येईल ? तेव्हा लग्नं ही जमतातच आणि जमणारच. त्यात फार काही नाही; पण फलाणंढकाणं लग्न कसं ठरलं याच्या ज्या भन्नाट हकीकती लोक आळवून आळवून सांगतात, त्या मात्र अरबी भाषेमधल्या सुरस आणि चित्तचक्षु चमत्कारिक कथांनाही लाजवणाऱ्या असतात.

एक काळ होता, जेव्हा लग्न जमवण्यासाठी अर्थात मुलीला 'पिवळी' करण्यासाठी बापाला जोडे झिजवावे लागतात, हुंडी वटवावी लागते, असे शब्दप्रयोग वापरले जात. लग्नाळू मुलांना 'स्थळं' म्हणत. 'ठिकाण' म्हणत

Scanning and PDF creation by : Majhi Duniya

आणि हे स्थळ, ठिकाण शोधण्यासाठी अपार कष्ट पडणं गृहीत धरलेलं असे. त्या ठिकाणी पत्रिका... कुंडली... टिपण टाकून येणं, ते जुळल्यास फोटो पाठवणं आणि फोटोची पसंती झाल्यावर प्रत्यक्ष चहापोह्यांचा कार्यक्रम - अशा किमान तीन टप्प्यांमधून कोणतंही लग्न जाई. चहापोह्यांच्या कार्यक्रमाला 'प्रोग्रॅम' हा कोडवर्ड होता. असे दिवसाला तीन-तीन प्रोग्रॅम ठरवून 'पैजेवर महिन्यात कार्टीला उजवतो' किंवा 'यंदा मार्गशीर्षात उजवल्याशिवाय राहणार नाही' असा चंग बांधणारे बापलोक किंवा मोठे भाऊ मी या डोळ्यांनी पाहिलेले आहेत. तेव्हा त्या कार्ट्यांना अस्मिता नसायच्या, असल्याच तर त्या दुखावल्या जाणाऱ्यांपैकी नसायच्या. सुमारे फेब्रुवारी-मार्च या दिवसांमध्ये कोकणातल्या गोऱ्यागोमट्या, ठेंगण्याठुसक्या, दात मजबूत पुढे असलेल्या गासड्या मुंबईच्या चाकरमान्या भावांकडं याव्यात आणि जूनपर्यंत गोऱ्या मनगटावर हळकुंड बांधून हिरव्यागार बांगड्या किणकिणत दृष्टीपुढून सराव्यात, हे दृश्य सरावाचं होतं. त्या काळात लग्न जमवण्यातली धडाडी वगैरे सुरस कथांना जन्म द्यायची.

'आमचा वसंता पहिल्यापासून धगुडाच... यंदा कर्तव्य आहे का, आहे का, असं विचारत चाळीचाळीत फिरलेनी बघा तो आणि त्याचे मित्रबित्र! गोदीचा पहिला प्रोग्रॅम मार्चमध्ये केलेनी... तर मेच्या तिसऱ्या आठवड्यात दारात वाजंत्री हजरच! आता येत्या मार्च-एप्रिलपर्यंत बारशाच्या घुगऱ्या वाटल्या की जिंकलेनी!'' अशा बढाया इथे स्मराव्यात.

आज विचार केला तर कुठला तरी क्वेश्चनेअर भरत दारोदारी फिरावं तसं दारोदारी फिरून, 'लग्न करता का लग्न', असं विचारण्याची कल्पना भीषण वाटते; पण तेव्हा ते तसं चालायचंच. त्यात भूषण मानणारे भिडूही निघायचे. दुसऱ्या बाजूनं, एखाद्या मुलानं एकशे पाच मुली पाहिल्या. तीन वर्षांपूर्वी नाकारलेल्या मुलीलाच यंदा होकार दिला. गुलाबी साडी नेसून समोर येणाऱ्या पहिल्या मुलीला होकार द्यायचा ठरवला होता; तसंच केलं. असल्या भन्नाट कहाण्याही प्रसृत व्हायच्या. एकशे पाच, दोनशे दहा-तीनशे पंधरा वगैरे पटीत मुली बघणाऱ्या नरपुंगवाचं वास्तवात कुणी तोंडही बघू नये; पण ही आजची विचारसरणी झाली. त्या काळात लग्न जमण्यातल्या अशा अनेक शौर्यकथा ऐकू येत खऱ्या. माणसानं कशात पुरुषार्थ मानावा हे काय सांगता येतं?

ओघाओघानं इन्स्टण्टचा जमाना आला तसा या शौर्याला विराम मिळाला आणि लग्न जमवायला कसा काही त्रास पडला नाही. ते कसं हातासरशी, चुटकीसरशी, इन्स्टण्ट जमलं याची हवा पसरू लागली. पूर्वी लग्न जमायला म्हणे गुरूबळ, बाशिंगबळ लागायचं, आता या शब्दांची जागा 'गट-फीलिंग',

Scanning and PDF creation by : Majhi Duniya

'क्लिकिंग' अशा शब्दांनी घेतली.

मुळामध्ये आता शहरी पालकांवर मुलामुलींची लग्नं जमवण्याची वेळ कमीच येते. त्यासाठी कॉलेजं काढलेली असतात. एकदा कॉलेजमध्ये नाव नोंदवलं की बहुतेकदा वधूवरसूचक मंडळात नाव नोंदवायची गरज भासत नाही. लग्न जमवण्याच्या खटाटोपात जाता जाता जमलं तर एखादी पदवीही काही काही तरुण मंडळी पदरात पाडून घेतात. सुस्वरूप पोरी आणि उद्योगी पोरगे हे सहसा कॉलेजच्या पहिल्या वर्षानंतर मोकळे, एकेकटे राहात नाहीत. त्यांना प्रेमवेडे करण्यासाठी कॉलेजं नाना डे योजतात. रोझ डे, फ्रेंडशिप डे, ट्रॅडिशनल डे असं करता करता वर्षअखेर बहुतेक घोडे प्रेमाची रेस जिंकून जातात. घरच्या मंडळींना प्रचंड अंधारात ठेवून आपण काहीतरी अलौकिक पराक्रम करतोय, असं त्यांना वाटत असतं. आपल्या डोक्यात याचा प्रकाश फार पूर्वीच पडलाय याबद्दल घरचे लोक त्यांना अंधारात ठेवतात. असं सगळ्यांना बनवता बनवता जेव्हा प्रत्यक्ष बोहल्यावर चढण्याची वेळ येते तेव्हा मात्र एकच सूर आळवला जातो, 'किती अचानक लग्न ठरलं हो! एवढ्या घाईत सगळी तयारी करता करता जीव अगदी गांगरून गेला.'

प्रत्यक्षात या लक्ष्मीनारायणांना बागेबागेत बागडताना गावातल्या प्रत्येक माणसानं बघितलेलं असो, दोन्ही घरांमध्ये भरपूर डोकेफोड झालेली असो, तू मला मेलास, मी तुला मेले/मेलो या छापाचे प्रेमसंवाद झालेले असोत, लग्न ठरतं ते मात्र अचानकच. अचानक, अवचित, ध्यानीमनी नसताना लग्न जमण्यात काय एवढं थ्रिल वाटतं ते त्यांचं ते जाणोत. काही लग्नं भलतीच फिल्मी पद्धतीनं ठरतात. आर्चिसमध्ये कार्ड विकत घेताना त्यानं तिला ओझरतं पाहिलं आणि देअर अ‍ॅण्ड देन ही डिसायडेड, 'लग्न करीन तर हिच्याशीच!' असे थरारक संवाद खूपदा ऐकू येतात. फार तर या नाटकाचं थिएटर बदलतं. म्हणजे 'आर्चिसमध्ये कार्ड घेताना' बघण्याऐवजी 'बरिस्टामध्ये कॉफी पिताना' किंवा 'वैशालीत डोसा खाताना' किंवा 'क्रॉसवर्डमध्ये पुस्तकं बघताना' असंच कुणी कुणाला ओझरतं-धावत-चुटपुटतं पाहतं आणि लग्नप्रतिज्ञा करून टाकतं. यासाठी आणखी लोकेशन्स आणि सिच्युएशन्स पुरवायला हिंदी सिनेमे बसलेलेच आहेत.

इतकं चौफेर, प्रेरक, उत्तेजक वातावरण असूनही काही नाकर्त्या माणसांना स्वत:ची लग्नं स्वत: जमवता येत नाहीत. ते कॉलेजची फी वाया घालवतात आणि आईवडिलांना कामाला लावतात. स्थळं बघताना, मुलीला दाखवताना ते कितीही टेकीला आले तरी लग्न जमवल्यावरचं एक वाक्य कधीही बदलत नाही, 'अगदी हां हां म्हणता लग्न जमलं बाई.' आजही एखाद्यावर मुलगी दाखवून

Scanning and PDF creation by : Majhi Duniya

उजवायची वेळ येते तेव्हा अजून एक नाट्यमय प्रसंग घडतो. नेमकी दाखवायच्या वेळेला मुलीला सर्दी झालेली असते. किंवा ताप आलेला असतो किंवा दाढ दुखत असते. हे काही जमलं नाही तर नेमका त्या दिवशी तिला कॉलेजमधून, कामावरून घरी येताना खूप उशीर झालेला असतो. घरी आल्यावर आवरायला, नट्टापट्टा करायला वेळ मिळालेला नसतो आणि इतक्या अवतारातही बघताक्षणी नवरदेवानं तिला पसंत केलेलं असतं. एवढी आजारी-थकलेली-निरुत्साही मुलगीसुद्धा चटकन पसंत पडते म्हणजे मुळात ती किती सुंदर, आकर्षक असेल, हे ऐकणाऱ्यानं समजून घ्यावं. मला अशा वेळेस या सर्दीतापाचे आभारच मानावेसे वाटतात. नवरीला सर्दी झालेली नसती तर नवरदेवाला घाईगर्दी आवरली नसती आणि पृथ्वीराजानं संयोगितेला पळवावं तसं हातोहात हिला पळवून घेऊन गेला असता आणि त्या भरधाव वेगानं जाताना वारा लागून हिला खरीच सर्दी झाली असती. एका लग्नात किती ही विघ्नं ?

मुलगी आजारी/अवतारात असतानाही पसंत पडली हे जाहीर करायला लोकांना जसं आवडतं, तसंच 'मुलीला अमक्या तमक्यानं मागणी घातली,' ही कल्पनाही प्रचंड रम्य वाटते. मुलीला मागणी येणं म्हणजे तिचा अंतिम विजय ! वरपक्षाचा अंतिम आणि चिरंतन पराजय. एवढी मागणी घालून केलीस ती काय अशी राबवायला ? यासारख्या प्रश्नाला त्यांनी कायम सज्ज राहावं. खरी गोष्ट अशी असते की लग्नाळू मुलामुलींचे पालक आपापल्या अपत्यांना बऱ्यापैकी जोडीदार मिळावे म्हणून नेहमीच टेहळणीवर असतात. तशी शक्यता आढळली की दुरून दुरून अंदाज घेतात, खडे टाकतात, वजन टाकतात, काही वेळा शब्दही टाकतात आणि तो अव्हेरला गेला तर त्या व्यक्तीचं नाव टाकतात; पण हे सगळं नंतर. नुसती एखाद्या वरपक्षाच्या दूरस्थ व्यक्तीकडून 'मुलीच्या लग्नाचा विचार करताय का ?' अशी चौकशी झाली की 'आलीऽ आलीऽ मागणी आली' अशी हाकाटी करायला लागतात, त्याची फार मजा वाटते. चौकशी काय झाली, मागणीच आली, पायघड्या घातल्या गेल्या, हत्तीवरून अंबारी धाडली, तुमची मुलगी द्या अन् एकदाचा आमच्या कुळाचा उद्धार करा असा लकडा लावला; इथवर सांगणाऱ्यांची मजल जाते. एखादा वरपिता मुलगी मिळेपर्यंत सरळसरळ वधूपित्याच्या दाराशी उपोषण करत बसल्याची गोष्ट तेवढी अजून ऐकली नाही. येईल ऐकू तीही कधी तरी ! मागणीची मागणी कोणाला काय करायला लावेल ते काय सांगावं ?

त्यात आता अमेरिका नावाचं नवंच प्रकरण आपल्या जीवनात आलंय. त्यामुळं अमेरिकेतून चौदा दिवसांच्या सुट्टीवर येऊन तेवढ्यात वरवधू बघणं-